सकाळ



गडहिंग्लज : 'रवळनाथ'तर्फे कोरोना योद्धे डॉक्टरांचा सत्कार करताना शाखाधिकारी सुनील जाधव. शेजारी बाबासाहेब मार्तंड, अशोक सुळकुडे.

# कोरोना योद्धे डॉक्टरांचा 'रवळनाथ'तर्फे गौरव

गडहिंग्लज, ता. १ : कोरोना महामारीच्या काळात स्वत:च्या जीवाची व आपल्या कुटुंबाची पर्वा न करता रुग्णसेवा बजावत हजारो रुग्णांना जीवदान दिलेल्या कोल्हापूर, बेळगाव व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डॉक्टरांचा श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सत्कार करण्यात आला.

'डॉक्टर डे'चे औचित्य साधून श्री रवळनाथ परिवारातील पदाधिकारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गडहिंग्लज, आजरा, नेसरी, चंदगड, निपाणी, जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगाव, कुडाळ व परिसरातील आरोग्य सेवेत काम करीत असलेल्या प्रत्येक रुग्णालयात समक्ष भेटून पुष्पगुच्छ, शुभेच्छापत्र देऊन डॉक्टरांचा सत्कार केला. याबद्दल डॉक्टर मंडळींनी कृतज्ञता व्यक्त केली.

या वेळी 'रवळनाथ'चे संचालक महेश मजती, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, शाखाधिकारी अशोक सुळकुडे, शाखाधिकारी सुनील जाधव आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
02/07/2021 Page No. 4

पुढारी

# कोरोनाकाळात डॉक्टरांचे योगदान मोठे : दीपक कोले

## 'रवळनाथ हाऊसिंग'तर्फे डॉक्टरांना सन्मानपत्र

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**



**बेळगाव : डॉ. धाकोजी यांचा सत्कार करताना दीपक कोले. शेजारी डॉ. चंद्रशेखर धाकोजी.**

कोरोनाच्या जागतिक महामारीत डॉक्टरांनी स्वत:सह आपल्या कुटुंबाची पर्वा न करता अव्याहतपणे सेवा देऊन अनेकांना जीवदान दिले. या डॉक्टरांचे कोरोना काळात योगदान मोठे आहे, असे मत रवळनाथ को ऑप. हाऊसिंग फायनांन्स सोसायटीचे बेळगाव शाखाधिकारी दीपक कोले यांनी व्यक्त केले.

खासबाग येथे गुरुवार, दि. १ रोजी सोसायटीतर्फे डॉक्टरांच्या निवासस्थानी भेट देऊन सन्मानपत्रसह गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

सोसायटीचे संस्थापक चेअरमन एम. एल. चौगुले व बेळगाव शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे यांच्या मार्गदर्शनाखाली गोंधळी गल्ली, खासबाग, भाग्यनगर, अनगोळ, शहापूर, टिळकवाडी यासह अन्य ठिकाणी डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

डॉ. चंद्रशेखर धाकोजी म्हणाले, प्रत्येक रुग्णाला जीवदान देणे हे आमचे आद्यकर्तव्य आहे. कोरोनासारख्या जागतिक महामारीत सर्वांनी मिळून लढा देऊ.

खासबाग येथील डॉ. चंद्रशेखर धाकोजी, डॉ. अनुपमा धाकोजी, डॉ. मयुरी धाकोजी, गोंधळी गल्लीतील मधुमेहतज्ज्ञ डॉ. हरिविठ्ठल पाटील, अनसूरकर गल्ली येथील डॉ. संचिता पाटील, अनगोळ येथील डॉ. एन. आर. मुनवळ्ळी यांच्यासह अन्य डॉक्टरांचा गौरव करण्यात आला. सोसायटीचे कर्मचारी संतोष पाटील यांनी यासाठी परिश्रम घेतले.

Bahar Edition
Jul 3, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

तरुण भारत
शनिवार, ३ जुलै २०२१

# कोरोना योद्धे डॉक्टरांचा 'रवळनाथ'तर्फे सत्कार



**गडहिंग्लज : कोरोना योद्ध्यांचा सत्कार करताना महेश मजती, बाबासो मार्तंड, अशोक सुळकुडे, सुनिल जाधव.**

**गडहिंग्लज :** कोरोना महामारीच्या काळात स्वतःच्या जीवाची व आपल्या कुटुंबाची पर्वा न करता रुग्णसेवा करत हजारो रुग्णांना जीवदान दिलेल्या कोल्हापूर, बेळगाव व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डॉक्टरांचा येथील रवळनाथ को-ऑफ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सत्कार करण्यात आला. 'डॉक्टर्स डे' चे औचित्य साधून श्री. रवळनाथ परिवारातील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी गडहिंग्लज, आजरा, नेसरी, चंदगड, निपाणी, जयसिंगपूर, कोल्हापूर, बेळगाव, कुडाळ आणि परिसरातील आरोग्य सेवेत काम करीत असलेल्या प्रत्येक रुग्णालयात समक्ष भेटून पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र देवून डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रवळनाथचे संचालक महेश मजती, जनसंपर्क अधिकारी बाबासो मार्तंड, शाखाधिकारी अशोक सुळकुडे, सुनिल जाधव उपस्थित होते.